# पुणे विद्यापीठ

**परिपत्रक क्रमांक : २२८/२०१३**

पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/विद्यापीठ विभागातील विज्ञान विद्याशाखा आणि विज्ञानेतर विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या **विद्यार्थ्यास** दरवर्षी आलटून–पालटून **" ह.भ.प. योगमहर्षी राष्ट्रीय किर्तनकार, रामचंद्र गोपाळ शेलार ऊर्फ शेलारमामा सुवर्णपदक"** प्रदान करण्यात येते. सन २०१३–१४ मध्ये विज्ञान विद्याशाखेव्यतिरिक्त इतर विद्याशाखेच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यास विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभात हे सुवर्णपदक प्रदान करण्यात येणार आहे.

या परिपत्रकाद्वारे सर्व विद्यापीठ विभागप्रमुख/प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की,**"ह.भ.प. योगमहर्षी राष्ट्रीय किर्तनकार, रामचंद्र गोपाळ शेलार ऊर्फ शेलारमामा सुवर्णपदक"** साठी खाली उल्लेख केलेल्या नियम व अटी नुसार विद्यार्थ्यांची माहिती आवश्यक कागदपत्रे व शिफारशीसह **दिनांक ९ नोव्हेंबर, २०१३ पूर्वी** शैक्षणिक प्रवेश विभाग, पुणे विद्यापीठ येथे प्रत्यक्ष (हस्तपोच) सादर करावे.

**नियम व अटी :**

१) सदर पारितोषिक शैक्षणिक वर्ष २०१२–१३ मध्ये विज्ञान विद्याशाखेव्यतिरिक्त इतर विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये विषेश गुणवत्ता प्राप्त केलेल्या एका विद्यार्थ्यास प्रदान करण्यात येईल.

२) इयत्ता दहावी, बारावी व पदवी परीक्षेतील गुण हे प्रथम वा द्वितीय क्रमांकाच्या पात्रतेचे असावेत.

३) विद्यार्थी भारतीय संस्कृती, आचार, विचार, भारतीय परंपरा मानणारा व स्वत:च्या दैनंदिन जीवनात आचरण करणारा असावा.

४) विद्यार्थी सर्व भारतीय व परदेशी क्रीडा तसेच वैयक्तिक व सांघिक अशा क्रीडा स्पर्धांमध्ये जास्तीतजास्त पारिताषिके मिळविलेला असावा. यामध्ये ध्यानधारणा, प्राणायम, योगासने करणाऱ्या विद्यार्थ्यास प्राधान्य द्यावे.

५) गायन, नृत्य, वक्तृत्व, नाटय व इतर कलांमध्ये नैपुण्य प्राप्त केलेला असावा.

६) रक्तदान, श्रमदान, पर्यावरण रक्षण व प्रदूषण नियंत्रण कार्य, साक्षरता व स्वच्छता मोहीम तसेच एड्स रोगाविरूध्द जनजागरण मोहिम इ. मध्ये सहभाग असावा.

७) विद्यार्थी शाकाहारी व निर्व्यसनी असावा.

८) पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विद्यार्थी उपलब्ध नसल्यास पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्याचा विचार करण्यात येईल.

९) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थ्याला अध्यादेश क्र. १०९,११० व १४३ ची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१०) अध्यादेश क्र. १६८ नुसार परीक्षेस बसणारा विद्यार्थी सुवर्णपदकास पात्र ठरणार नाही.

गणेशखिंड,पुणे–७ )
संदर्भ:–शै.प्रवेश/८१५८ )
दिनांक: १६-१०-२०१३ )

16/10/2013
सहा.कुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग